# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २७.०२.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. २६/०२/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३०३ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ३,०४,४५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. २६/०२/२०२३ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०३ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन ३२.८८ लिटर दारू असा एकुण ७,२१०/—रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा. पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २६/०२/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण ०१ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपघाताचे दाखल गुन्हे :—**

दि.२६/०२/२०२३ रोजी पोस्टे बाळापूर येथे अपघाताचा ०२ गुन्हा कलम २७९,३३७,३३८,३०४(अ) भादवी प्रमाणे दाखल होवुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम अंतर्गत दि. २६/०२/२०२३ रोजी पोस्टे हटटा येथे ०१ इसमाविरूध्द कलम ४/२५ भाहका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले असुन पुढील तपास पोलीस करित आहेत.

**अवैध रेती/गौण खनिज वाहतुक करणाऱ्या विरूध्द गुन्हा नोंद :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध रेती वाहतुक करणाऱ्या विरूध्द दिनांक २६/०२/२०२३ रोजी पोस्टे नर्सी ना. येथे ०१ ठिकाणी कलम ३७९,३४, भादवी व सहकलम ४८(७)(८) सह कलम ४८ गौन ख.अधी अन्वये गुन्हा दाखल होवुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.